

# ओंजळ फुलांची

२०१९-२०


व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन

द्वारा संचालित

## अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय, भारसिंगी

e-mail : admv_bharsingi@rediffmail.com

website :www.adm.edu.in, Ph & Fax : 07105-233329, 233537, 233533

## व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, नागपूर

### संचालक मंडळ



**मा.रणजीतबाबू देशमुख**

अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री.एस.बी.देशमुख | उपाध्यक्ष |
| श्री.वाय.डी.चालखोर | सचिव |
| श्री.डी.वाय.राऊत | सहसचिव |
| श्री.के.के.नटराजन | सहसचिव |
| श्री.एस.सी.देशमुख | कोषाध्यक्ष |
| श्री.ए.आर.देशमुख | सदस्य |
| श्री.सी.के.बरेठीया | सदस्य |
| श्री.पी.एन.मक्रमपूरे | सदस्य |
| श्री.एस.एम.बांदरे | सदस्य |
| श्री.ए.एस.पारेख | सदस्य |

# प्राचार्यांचे मनोगत



ओंजळ फुलांची हा आमच्या महाविद्यालयाचा वार्षिकांक प्रकाशित होतांना खरचं मनाला अतिशय आनंद होत आहे. कस्तुरी मृगाच्या कस्तुरीचा सुगंध जसा आसमंतात दरवळत असतो. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील अनेक अमुल्य क्षणांचा सुगंधी ठेवा आमचे विद्यार्थी जतन करून आपल्या सोबत घेऊन जात असतात. याचेच एक प्रतिबिंब वार्षिकांकाच्या निमित्त्याने साकारत असते.

सद्य परिस्थितीत पर्यावरण हा महत्वाचा विषय सर्वांनाच भेडसावित आहे नव्हे, आमच्या अफाट लोकसंख्येच्या देशात ती एक समस्या झालेली आहे. त्यामुळेच या सत्रात पर्यावरण विषयाला महत्व देत अनेकविध लेखनसामुग्री आमच्या विद्यार्थ्यांकडून मागविण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आमच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी अनेकविध मोलाची कामगिरी या क्षेत्रात केलेली आहे. चार भिंतीच्या आतील शिक्षणासोबतच सामाजिक बांधीलकी जपणारे अनेक प्रकल्प आपण राबविले पाहिजे. ही आमची पक्की धारणा आहे व त्या दृष्टीने आमचे सतत प्रयत्न सुरू असतात. हे या अंकाचे अवलोकन करतांना आपल्याला दिसून येईल. यामध्ये आमच्या संस्थेचे अध्यक्ष मा.रणजीतबाबू देशमुख, संस्थापक डॉ.भाऊसाहेब भोगे तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांच्या या यशामध्ये फार मोठा वाटा आहे.

कुठेलही सुंदर शिल्प घडविण्यासाठी सात गोष्टींची आवश्यकता असते. यापैकी पहिला व महत्वाचा घटक म्हणजे शिल्प घडविणारा शिल्पकार हा होय. इतर घटकांमध्ये कच्चा माल, शिल्पकलेचे ज्ञान, उपकरणे, ईच्छा, कल्पकता व प्रयत्नांची पराकाष्ठा अशा सर्व बाबींचा जेव्हा मेळ जमतो. तेव्हा उत्कृष्ट शिल्प घडत असतं. आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी हे सदोदीत प्रयत्नांची पराकाष्टा करून उत्कृष्ट निर्मितीची कास धरीत असतात. हा वार्षिकांक तयार करतांना या संपदक मंडळाचे, सर्व कर्मचारी वृंदाचे मी कौतुक सोबतच हार्दिक अभिनंदन करतो.

शेवटी कळीचे फुलात रूपांतर होतांना जशी एक – एक पाकळी उमलत जावी त्याचप्रमाणे आपणही या ओंजळ फुलांची पाने अलगद चाळतांना मोहना स्वरुपी फुलणाऱ्या सुंदर फुलाचा आस्वाद घ्यावा, हीच अपेक्षा व आशा.

**डॉ. विजय धोटे**
प्राचार्य



# संपादकीय

**''ओंजळ ही भरली शब्दसुमनांनी**
**मनोभावे अर्पण केली विद्यार्थ्यांनी**
**ओंजळीत कथा, कविता आणि साहित्य**
**प्रत्येकाने एकदातरी वाचावी नित्य''**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून साकार झालेला 'ओंजळ' हा वार्षिकांक यावर्षीही पूर्णत्वास आला. खरोखरच विद्यार्थ्यांच्या तरल व उत्स्फूर्त भावना आणि विचारांचा वेध घेण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर वार्षिकांत निर्मिती हे एक प्रभावी माध्यम असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अनेक कवी, लेखक दडलेले असतात. वार्षिकांकातील लेखनाच्या निमित्याने विद्यार्थ्यांची मन:स्थिती, वैचारिक जडणघडण व त्यांच्या भविष्याविषयी असलेल्या भावना व कल्पना अभिव्यक्त होत असतात. विद्यार्थ्यांमधील प्रतिभाशक्ती विकसीत व्हावी, त्यांचे व्यक्तिमत्व सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्मयीन संस्काराने फुलून यावे यासाठीच वार्षिकांकाची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेचे सौंदर्य टिपण्यासाठीच 'ओंजळ' हा वार्षिकांत आकारास आला.

वार्षिकांकाच्या प्रकाशनासाठी साहित्य मागविले, त्याला विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला व हळूहळू साहित्याचा प्रवाह सुरू झाला आणि एवढे साहित्य गोळा झाले की त्यातील उत्कृष्ट साहित्य निवडावे लागले. त्याकरीता वाङ्मय समीतीचे सहकार्य लाभले. 'ओंजळ'च्या जडणघडणीत अनेकांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांचा नामनिर्देश इथे करणे शक्य नसले तरी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतांना मला आनंद वाटतो.

संस्थेचे अध्यक्ष मा.रणजीतबाबू देशमुख, संस्थापक मा.डॉ.भाऊसाहेब भोगे, तसेच संस्थेचे कार्यकारी मंडळ व स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य यांचे सदोदीत मार्गदर्शन व सहकार्य लाभले तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय धोटे यांनी 'ओंजळ' प्रकाशीत करण्यास प्रेरणा दिली. साहित्याची योग्य निवड करण्याकरीता प्रा.पुसाम, प्रा.डॉ.पवार, प्रा.उपासे, प्रा.वाळके, प्रा.घोरपडे, प्रा.नांदगावे, प्रा.गायकवाड, प्रा.देशमुख, प्रा.ठाकरे, श्री.अशोकराव घारपुरे या सर्वांचे सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयीन सर्वच कर्मचारी वर्गाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपात सहकार्य लाभले आणि त्यातूनच आज ''ओंजळ''हा वार्षिकांक साकार झाला.

**''ओंजळीत आहे भाषा भगिनी इंग्रजी, मराठी आणि हिंदी**
**विद्यार्थ्यांना मिळाली विचार व्यक्त करण्याची संधी''**

शेवटी पुन्हा एकदा ओंजळच्या सर्वच शिल्पकारांविषयी कृतज्ञता व्यक्त करून मी माझ्या लेखणीला विराम देते.

**प्रा.डॉ.साधना जिचकार**
**संपादक**

# मराठी विभाग

**प्रभारी प्राध्यापक**

**प्रा.डॉ.साधना जिचकार**

# प्रार्थनेचे अंतरंग...

योगेश उईके
बी.ए.भाग–३

प्रार्थना अनादि काळापासून आपल्या भारत खंडात प्रचलित आहे. पणती नव्या उद्‌देशाने जागृत करण्यासाठी आपण कटिबध्द झालो आहोत. महाभारताच्या कालोचित अर्थ भागवतात सांगावा लागला, उपनिषदांचा स्पष्टार्थ गीतेत व्यक्त करावा लागला. त्याचप्रमाणे सामुदायिक प्रार्थनेचाही नवीन अर्थ आज लोकांना सांगण्याची गरज आहे. आज बहुसंख्य लोक देवाचे अस्तित्व मानतात, देवाची भक्तीही करतात. पण ही भक्तीची उपासना जशी देवाप्रती आहे तशीच देशाप्रतीही हवी. या भक्तीचे स्वरूप कालानुरूप बदलले पाहिजे.

भारतात अनेक तीर्थक्षेत्रे, मंदिरे, मानव धर्माच्या प्रचारासाठीच निर्माण करण्यात आली आहे.ही सर्व स्थळे नि:स्वार्थपणे ज्ञानदानाची आणि सत्कार्याची प्रेरणास्थाने ठरली पाहिजे. त्यातून प्रार्थनेचा आवाज दुमदुमला पाहिजे. संध्याकाळ झाली की, गावातील सर्व लोक गुरूदेवाच्या अधिष्ठानाखाली एकत्र आले पाहिजेत. सर्वांनी सर्वांच्या सुखाकरिता पूरक होण्याची शिक्षा–दीक्षा या प्रार्थनेद्वारा घेतली पाहिजे असे झाले तर ही सामुदायिक प्रार्थना या युगातील महामंत्र ठरल्याशिवाय राहणार नाही.

'महात्माफुले यांनी म्हटले आहे की, प्रार्थना ही तेज निर्माण करणारी अजब शक्ती आहे. याच तेजाने आम्ही संपूर्ण जगात चमकू शकू. याच प्रार्थनेच्या द्वारा आम्ही सर्व जगातील महापुरूषाच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्यांना उजाळा देऊन मानवतेचे मंगलद्वार खुले करू शकतो. त्या करिता सत्य, अहिंसा आणि अध्यात्माची कास धरणे अगत्याचे आहे.

कोणताही आनंद हा दोन गोष्टीवर अवलंबून असतो. मग तो ब्रम्हानंद असो की, विषयानंद असो. विषयानंदाला सुध्दा नवरा बायको हे दोन लागतात. आध्यात्मिक आनंदाची सुध्दा तिच गोष्ट आहे. पवित्र वातावरण आणि मन प्रवृत्ती या दोन गोष्टी एकत्र जमविल्याशिवाय आध्यात्मिक आनंदाची गोडी चाखता येत नाही. म्हणून ही शक्ती आपण सारखी वाढविली पाहिजे. नाहीतर आपण देवळात गेल्यावरही तेथे दगड दिसू लागतील. खरे सत्य दिसणार नाही. त्यासाठी आपण आत्मानुभव घेतला पाहिजे. परमेश्वर स्वरूप प्रत्येक ठिकणी शोधायला शिकले पाहिजे.

हे परमेश्वरा ! जे लोक तुला शरीराचा किंवा धर्माचा बांधवडा समजता त्यांना तुझ्या खऱ्या अधिकाराची कल्पना आलीच नसावी असे मला वाटते. तू व्यवहार आणि परमार्थाची एकरूपता करून देणारा म्हणजे विश्‍व, माया, जीव आणि ब्रम्ह यांची अभेद रूपत्व दर्शविणारा ज्ञानप्रकाश आहे. हे समजण्याचे सामर्थ्य मानवाच्या ठिकाणी निर्माण झाले पाहिजे. तेव्हा कुठे ''अवघाची संसार सुखाचा करीना आनंदे भरीन तिन्ही लोक'' असा प्रत्यय प्रार्थनेच्या अंतरंगातून मानवी मनाला आल्याशिवाय राहणार नाही.

# जननायक - डॉ.भाऊसाहेब भोगे

शुभम वानखेडे
बी.ए.भाग–३

देवग्राम म्हणजेच ऋषीश्वराच्या पदस्पर्शाने पावन झालेली पुण्यभूमी. कपीलेश्वराच्या दिव्यत्वाची अनेक भक्तांना वारंवार प्रचिती यावी असं पुण्यक्षेत्र. गाव म्हणजेच पूर्वाश्रमीचं थुगांवदेव. देशाच्या हृदयस्थळावर वसलेल्या नागपूर जिल्ह्यातील, नरखेड तालुक्यातील आडवणावर वसलेलं हे एक छोटसं गाव. साधारणत: गावाची लोकसंख्या ही ३५०० च्या घरात असावी. ही गोष्ट अशाच एका सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्व असणाऱ्या व्यक्तिची आहे. लहानुजी व मंजुळाबाई यांच्या अत्यंत बिकट परिस्थिती असणाऱ्या कुटूंबातील ही गोष्ट.

वर्धा नदीच्या काठावर एक घर होतं. घरही त्यास कसं म्हणावं, कारण त्या गवताच्या चंद्रमोळी झोपडीतून दिवसा सूर्यप्रकाश आणि रात्री चंद्रदर्शन व्हायचं. घरी कुटुंबाच्या दोन वेळच्या जेवणाची ददात होती. दररोज मोलमजुरी करायला गेल्याशिवाय पोटात अन्न जात नसे. घरी अठराविश्व दारिद्रय असतानाच पुंजाबाई ही मुलगी जन्मास आली. कुटुंबाचा गाडा नित्यनेमाने चालू असतानाच, काही दिवस लोटून गेलेत. काळ वेगाने पुढे चालला होता. वसंत ऋतु परतीला होता. फाल्गुन महिण्याची चाहूल लागायला लागली होती. रस्त्यावरील लाल गुलमोहर फुलायला निघाला होता. रानावनातील आणि कोरड्या वर्धा नदीच्या पात्राच्या काठावरील पळस गर्द फुलायला लागला होता.

अशातचं अष्टमीच्या रात्री आकाशातून एक तेजस्वी तारा कोसळताना दिसला. आणि दुसऱ्याचं दिवशी फाल्गुन कृष्ण नवमीला म्हणजेच १० मार्च १९४३ या दिवशी या अत्यंत गरीब कुटुंबात एक बाळ जन्माला आलं. या बाळाला पहाताक्षणीच दाई म्हणाली, बाळाच्या चेहऱ्यावर तेज दिसते, बाळ मोठेपणी खूप मोठा माणूस होईल.

हळूहळू दिवसामागून दिवस जावू लागले. ईकडे घरी मंजूळाबाई जवळ बाळाला दूध पाजायलाही दमडी नसायची. बाळाला झोपवितांना मंजुळाबाई पाळण्याच्या दोरीला धक्का देता देता ज्वारीच्या पिळाची पेज देऊन बाळाचं उदरभरण करायची. बाळ हळुहळु बोबड्या बोलांनी मोठं हावू लागलं. रांगता रांगता चालायला लागलं. छोटासा भाऊ गावातल्याच जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकू लागला. गावचं प्राथमिक शिक्षण पूर्ण करून बाहेरगांवी हायस्कूलचं शिक्षण घेण्याचे विचार डोक्यात येत होतं. पण दारात अनेक अडचणी उभ्या होत्या.

अशातचं एका शिबिरातील कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक वामन कृष्णाजी चोरघडे भाषणात म्हणाले की, ''परिस्थिती ही कधीही शिक्षणाच्या आड येवू शकत नाही.'' नेमके हेच शब्द भाऊ नी हेरले I भाषण संपल्यानंतर वामनराव चोरघडे नागपुरला निघून गेले.

पण लहानग्या भाऊला त्यादिवशी रात्रभर झोप आली नाही. भाऊ दूसऱ्या दिवशी सकाळीच स्नान उरकून, एक शर्ट व पायजमा झोळीत अडकवून अनवाणी पायांनी कुणालाही न सांगता नागपुरला निघाला. खिशात पैसे नाही, पोटात अन्न, पाणी नाही, जवळ पत्ताही नाही अशा स्थितीत भाऊ नागपुरला पोहचला. खूप पायपीट करीत मजल दरमजल करून पायातून वाहणाऱ्या रक्ताकडे दुर्लक्ष करीत, घराचा शोध घेता घेता एका घरी भर उन्हात भाऊ जावून पोहचला. घराचं दार बंद पाहून दारावरची बेल वाजवली. दार उघडल्यावर दारात एक खेडून मुलगा दिसला. वा.कृ.चोरघड्यांनी त्या बाळाची चौकशी करून त्यास आत घरात घेतलं. भाऊनी वा.कृ.चोरघड्यांना त्यांच्या भाषणाची आठवण करून दिली. ही भाऊची सत्वपरीक्षा होती.

भाऊ या सत्वपरीक्षेत पास झालेत. इथुनच भाऊच्या जीवनातील पुढच्या प्रवासाला सुरवात झाली. या काळात चोरघड्यांच्या घरची सर्वच प्रकारची कामे करून भाऊनी एम.कॉम., बी.एड. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे देह प्रपंचाचा दास समजून फूड इंस्पेक्टर ची नोकरी केली. नंतर एल.आय.सी.मध्ये काम केलं पण नोकरीत कुठेच मन रमत नव्हते. मनात अनेकदा समाजसेवेचे विचार वारंवार घोळू लागले होते. याच काळात पंढरीनाथ महाविद्यालय, नरखेड येथे अर्धवेळ व्याख्याता म्हणून कनिष्ठ महाविद्यालयात नोकरीला सुरूवात केली. पुढं नावारूपास आलेले हेच ते कर्मयोगी डॉ.भाऊराव उर्फ भाऊसाहेब लहानुजी भोगे.

डॉ.भाऊसाहेब भोगे यांची याच दरम्यान कमलाताई होस्पेटांशी भेट झाली. याच स्नेहातून पुढे सन १९७१ मध्ये विद्या शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेची स्थापना केली. यानंतर जन्मभूमीचे ऋण फेडण्यासाठी सन १९७२ मध्ये ग्राम सुधार योजना, थुगांवदेव या संस्थेची स्थापना केली. आज घडीला या दोन्ही ही संस्थांचा व्याप संपूर्ण विदर्भभर वाढला असून, डिगडोह, हिंगणा येथे एन.के.पी.साळवे वैद्यकीय महाविद्यालय, लता मंगेशकर हॉस्पिटल, दंत महाविद्यालय, फिजीयोथेरपी कॉलेज, नर्सिंग कॉलेज, पदवी व पदव्युत्तर कला, वाणिज्य महाविद्यालय, प्राथमिक शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, सी.बी.एस.ई. कॉन्व्हेंट स्कूल याचं जाळं आज संपूर्ण विदर्भातील खेडी, गाव व शहरात विणल्या गेलेलं आहे.

थुगांवदेवचं नाव देवग्राम करण्यासाठी ग्रामस्थांचा महत्वाचा पुढाकार घेऊन या पुण्यभूमीत शिक्षणाची गंगा आणली. आज या छोट्याशा गावात केजी टू पीजी शिक्षण देणारं एक आदर्श केंद्र अंत्योदय मिशन या नावानी उभे आहे. एकूण २५ एकर जागेवर वसलेली ही विशाल वास्तु डौलांनी उभी आहे. आज या शैक्षणिक संस्थेत जीवन विकास महाविद्यालय पदवी, पदव्युत्तर व स्किलबेस एज्युकेशन तसेच कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयापर्यंतचे गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्या जात आहे.

नागपूर बोर्डाच्या १२ वी परीक्षेत कलाशाखेत आज अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झालेले आहेत. एवढेच नव्हे तर विज्ञान शाखेतील अनेक विद्यार्थी नरखेड तालुक्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहेत. जीवन विकास विद्यालयातील पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणारी अनेक मुले जीवन शिक्षण मुल्य संस्कार घेऊनच जीवनात आज पुढे निघालेली आहेत.

दहावी शालांत परीक्षेत अनेक मुले तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातसुद्धा अग्रेसर आहेत.

जीवन विकास प्राथमिक शाळेत आजही दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. ऐवढेच नव्हे तर यासोबतच स्वयंसिद्धा प्रशिक्षण सुद्धा दिल्या जात आहे. खरतरं विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण देताना संस्काराचं पहिलं बाळकडू इथेच दिल्या जात आहे. याशिवाय या सी.बी.एस.ई कॉन्व्हेंट स्कुलच्या माध्यमातून गावखेड्यातील मुलांना इंग्रजी शिक्षणाची दालन उघडी करून दिलेली आहेत.

जीवन विकास आय.टी.आय.च्या निमित्ताने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित व्यवसायाधिष्ठीत शिक्षण देण्याचा यशस्वी प्रयत्न सुरू असून अनेक प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय मेळघाटातील दऱ्या-खोऱ्यात, दूर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी, कोरकू मुलांना माध्यमिक, उच्चमाध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण देण्यासाठी अंत्योदय मिशन ही सेवाभावी संस्था अविरतपणे उभी आहे.

भाऊसाहेबांनी स्थापन केलेल्या व्हीएसपीएम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन या संस्थेला ४८ वर्षे पूर्ण झालेली असून सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे वाटचाल सुरू आहे. तर ग्राम सुधार योजना म्हणजेच आजची अंत्योदय मिशन, देवग्राम या संस्थेला ४७ वर्षे पूर्ण झालेली आहेत. या दोन्ही रोपट्यांचे विशाल अशा अश्वत्थ वृक्षात रूपांतरण झालेले आहे.

मुळात डॉ.भाऊसाहेब नरखेड येथे नोकरी करतानाच कधी पायी तर कधी बसने प्रवास करीत होते. त्यांनी तळागाळातील दिनदलित, गोरगरीब, निरक्षर, खचलेल्या अशा अनेक जातीधर्माच्या मुलांना शिकवून रोजगाराला लावलं. आज १०००० पेक्षाही जास्त कुटुंबात ज्ञानाचा प्रकाश निरंतर तेवतो आहे. त्यांनी अनेक कुटुंबांना अर्थाजनाची संधी दिली. अनेक गरीबांना मदत करीतांनाच त्यांच्या मुलाचे संसार उभे केलेत. माणसातील माणूसपण नव्हे तर त्यांनी त्यांच्या ठायी देव पाहिला.

आज अंत्योदय मिशन देवग्राम या संस्थेच्या मार्फत विविध ठिकाणी रोगनिदान शिबीर, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर, श्रमसंस्कार शिबीर, जीवन शिक्षण संस्कार शिबीर, योग शिबीर, हुंडा प्रतिबंधक विचार शिबीर वेळोवेळी राबविले जात आहे. खरा देव मंदिरात नसून तो माणसात आहे. कर्म ही पूजा, हे डॉ.भाऊसाहेबांचे विचार, माणसाला, समाजाला येथील कर्मचारी वर्गाला प्रेरीत करीत असतात. त्यांनी अनेक गांधीवादी कार्यकर्ते व जीवाला जीव देणारी माणसे जोडलीत.

समाजाशी आपले असणारे नाते हे असे आहे की, आपण वेळोवेळी समाजात येणाऱ्या अडी अडचणींच्या प्रसंगात समाजासाठी धावून गेले पाहिजे असे त्यांना वाटत असे । समाजाचे ऋण फेडण्यासाठीच आपला जन्म झालेला असून हा समाजच माझे माता-पिता आहेत असे भाऊसाहेबांना आजही वाटते । ही समाज जीवनावरची त्यांची अढळ निष्ठा कधीही ढळली नाही । आज दि. १० मार्च २०१९ डॉ.भाऊसाहेब भोगे यांना वयाची ७५ वर्षे पूर्ण होत असून या अमृत महोत्सवी वर्षात भाऊसाहेब शतायुषी होवून निरंतर समाजसेवा करीत राहोत, अशी शुभकामना करूयात ।

# इंटरनेट आणि मराठी साहित्य

कु.सिमा वाय. बेहनिये
बी.ए.भाग–२

आजच्या आधुनिक काळात मानवी मनाचा आणि संगणकीय जाणीवांचा विचार करतांना मनुष्याच्या जीवन जाणीवांमध्ये फार मोठा बदल झालेला दिसून येतो. मनुष्य हा समाजशील प्राणी असल्यामुळे तो सामाजिक पातळीवर संबंधाचे जाळे निर्माण करून जीवन जगत असतो. एकमेकांशी संवाद साधणे, आपले जीवनानुभव कथन करणे, हा मानवी स्वभाव असल्यामुळे संवाद आणि संपर्क ही मानवाची मोठी गरज आहे. अलीकडच्या काळात माणसं जोडण्यासाठी, आपले भाषिक संबंध मजबूत करण्यासाठी माणूस मोठया प्रमाणात संगणकाचा वापर करू लागलेला आहे. आपल्या भावना व्यक्त करणे, विचार कल्पना मांडणे, अभिव्यक्त होत राहणे, मित्र मिळविणे, मैत्री जपणे—वाढविणे, नवी नाती प्रस्थापित करणे, चर्चा वादविवादात भाग घेणे, संदेश—पत्र पाठविणे, शुभेच्छा देणे अशा असंख्य कारणासाठी इंटरनेटचा वापर होतो आहे. म्हणूनच आजच्या युगाला आपण माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून संबोधत असतो. या युगात प्रत्येक गोष्ट झटपट आणि बिनचूक उपलब्ध होणे ही बाब अत्यावश्यक बनलेली आहे. यासाठी मानव वेगवेगळया साधनांचा वापर करीत आहे. संगणक हे त्यापैकी अतिशय महत्वाचे साधन आहे. या साधनाच्या द्वारे इंटरनेटच्या माध्यमातून चालणारा संवाद फार मोठया व्यापक आणि वैविध्य पूर्णपध्दतीने होतांना आपण बघत आहोत.

जगभरात आज सर्वाधिक संर्पक संगणकाच्या माध्यमातून होत असल्यामुळे मानवाच्या संवाद प्रक्रियेत संगणकाचे महत्त्व फार अनन्य साधारण ठरले आहे. आज तंत्रज्ञानामध्ये सर्वाधिक झपाटयाने माहिती तंत्रज्ञानाचा विकास होतो आहे. जगभर निर्माण झालेले इंटरनेटचे जाळे, लाखोच्या संख्येत असलेल्या वेबसाईट्स, या प्रत्येक संकेत स्थळावर संवादासाठी उपयोजित येणारे विविध पर्याय पाहता संवादाची गरज ध्यानात येते. इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे वहन मोठयाप्रमाणात सुरू झालेले आहेत. 'गुगल' सर्च सारखे सर्च इंजीन आपल्याला अचूक माहितीपर्यंत पोहचवित असल्यामुळे 'विकिपिडिया' सारखे मुक्त ज्ञानकोश आपल्याला माहितीच्या सागरात घेऊन जातात. हा ज्ञानकोश ज्ञान देण्याबरोबरच आपले ज्ञान जगापर्यंत घेऊन जाण्यास मदत करत असतो.

मराठी भाषेतही आता अनेक संकेतस्थळे हे काम करीत आहे. ही बाब आपल्यासाठी एक मराठी भाषिक म्हणून फार महत्त्वाची आहे. १९९६ साली 'मायबोली' मराठीतील पहिले संकेतस्थळ सुरू झाले. या वेबसाईटने जगाच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या मराठी माणसाला एकत्र आणले. मायबोली या वेबसाईटच्या रूपाने आधुनिक

जगाचे संवाद माध्यम असणाऱ्या इंटरनेट विश्वात मराठी भाषेने अगदी आत्मविश्वासाने पहिले पाऊल ठेविले आणि या माध्यमाची सारी सामर्थ्ये पेललेली दिसून येते. त्याचाच परिणाम म्हणून आज तुकारामाची गाथा, छत्रपती शिवाजी महाराज, गदिमाचे 'भावार्थ रामायण' ते अलीकडच्या अनेक कवींच्या कवितेपर्यंत अनेकांचे साहित्य इंटरनेटवर सहज उपलब्ध आहे. आता मराठी ईसाहित्य संमेलनही भरवली जात आहेत. या संमेलनांना मिळणारा प्रतिसाद अभुतपूर्व असतो. त्यामुळे परदेशात राहणाऱ्या मराठी भाषिकांना मराठी भाषेविषयीचा जिव्हाळा निर्माण होऊन ते या संकेतस्थळाद्ववारे पत्रव्यवहार सुविधा, वधु वर सुचककेंद्र, दिवाळी अंक विक्री यासारख्या उपलब्ध सोयीचा उपयोग करताना दिसतात.

अशा प्रकारे इंटरनेटचे हे विश्व अफाट आणि दिवसेंदिवस विस्तारत चाललेले आहे. केवळ मराठी भाषेपुरता या क्षेत्राचा विचार केला तर आज असंख्य मराठी संकेत स्थळे निर्माण झालेली पाहता येतात. १९९६ ला पहिले संकेतस्थळ प्रसिध्द झाले त्यानंतरच्या वीस वर्षात या क्षेत्रात मराठी भाषेने आश्चर्यकारक अशी झेप घेतलेली आहे. आज मराठीत शेकडो संकेतस्थळे उपलब्ध आहेत. मराठी पुस्तकांच्या विक्रींची दुकाने इंटरनेटवर आहेत. संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानेश्वरी, वेद यासारख्या ग्रंथासोबतच आधुनिक मराठी साहित्यही इंटरनेटवर उपलब्ध आहे. त्यामध्ये कुसुमाग्रजांची साहित्य संपदा , पु.ल. देशपांडे, गदिमा तसेच मराठी भाषा, साहित्य, संस्कृती विषयक माहिती उपलब्ध करून देणाऱ्या जवळपास संकेतस्थळे ५२ , व्यक्ती विषयक माहिती देणाऱ्या संकेतस्थळे १५, प्रसार माध्यम विषयक माहिती देणाऱ्या संकेतस्थळे २२, पर्यटनविषयक व धार्मिक स्थळांची माहिती देणारे संकेत स्थळे ०८, रोजगार विषयक माहिती देणारे संकेतस्थळे ०४, इतर महत्त्वाची माहिती देणारे संकेत स्थळे ०५, इंटरनेटवर उपलब्ध आहेत. त्यामुळे सर्वच प्रकारचे ज्ञान भांडार आपल्यासाठी फार मोठया प्रमाणात खुले आहेत असे दिसून येते. यावरून मराठी भाषा देखील इंटरनेटच्या माध्यामातून जगापर्यंत पोहचत आहे. आज मराठी भाषा व साहित्य इंटरनेटच्या परिप्रेक्ष्यात आल्यामुळे मराठीभाषेला या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या काळात मोलाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

हे सर्व खरे असले तरी आपण या प्रवाहाला समजून घेण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. अर्थात संगणकीय इंटरनेटचे शिक्षण घेऊन आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगाचे साक्षर नागरिक म्हणून आपली ओळख निर्माण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. तेव्हाच आपल्या देशाला डिजिटल भारताचे स्वप्न साकार करता येईल असे मला वाटते.

# राम गणेश गडकरी

कु.रिता आत्राम
बी.ए.भाग–३



महाराष्ट्रातील मराठी साहित्यातील शेक्पिअर म्हणून ज्यांची सर्व मराठी वाचकांना ओळख आहे ते म्हणजे राम गणेश गडकरी होय. यांचा जन्म १८८५ मध्ये गुजरात येथील नवसारी गावी झाला. त्यांचे बालपण गुजराती वातावरणात गेले. तेथे त्यांच्या शेजारी राहणाऱ्या नाटक मंडळीचे कार्य बघून गडकऱ्यांच्या बाल मनाला गुजराती नाटक लिहिण्याची इच्छा झाली. येथेच त्यांच्या बाल मनावर मराठी नाट्यकलेचे बीजांकूर आकार घेऊ लागले. परिणाम स्वरूप 'सुरसुदंरी' नावाच्या नाटकाची निर्मिती त्यांच्या हातून अवघ्या वयाच्या सहाव्या वर्षी झाली. केवळ तीन दिवसात निर्माण झालेल्या नाटकाला प्रयोग रूपाने सादर करण्यासाठी रंगभूमीच्या मंचावर पहिले पाऊल ठेवले आणि पहिली कौतुकाची थाप प्राप्त केली. नाटय कलेचा राम गणेश गडकरी यांच्या बालमनावर झालेला हा पहिला संस्कार होता. पुढे आलेल्या पितृ वियोगासारख्या कौटुंबिक आपत्तीला सामोरे जात आपली शैक्षणिक जबाबदारी पूर्ण करण्याचा आणि फर्ग्युसनसारख्या महाविद्यालयीन जीवनाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला परंतु त्यामध्ये त्यांना फारसे यश प्राप्त झाले नाही. त्यामुळे उच्च शिक्षण आणि तज्जन्य लाभ यावर आधारलेले त्यांचे सुख स्वप्न अर्थातच पूर्ण होऊ शकले नाही. यानंतर गडकऱ्याच्या आयुष्याला अकल्पित असे नवेच वळण लागले. त्यांना पुज्यनीय असलेल्या त्यांच्या वाड्. मय गुरूशी म्हणजे श्रीपादकृष्ण कोल्हटकरांशी त्यांचा परिचय झाला. यापूर्वीच त्यांचे कोल्हटकरांच्या वाड्. मयाशी नाते जडलेले होते. त्यांना शालेय जीवनापासून मुळातच वाचनाची आवड असल्यामुळे त्यांनी भारतीय आणि पाश्चिमात्य साहित्यिकांच्या साहित्याचे अध्ययन केले. परंतु कोल्हटकरांच्या वाड्.मयाची चांगलीच छाप गडकऱ्याच्या मनावर पडली. पुढे त्यांचा किर्लोस्कर नाटक मंडळीशी नोकरीच्या निमित्याने संबंध आल्यामुळे त्यांना नाटकाचे जग अगदी जवळून बघता आले. यातूनच त्यांना नाटयकलेची आवड निर्माण झाली आणि पुढे १९११ मध्ये त्यांनी आपले 'प्रेमसंन्यास' हे पहिले नाटक लिहिले आणि १९१२ मध्ये प्रयोग रूपाने रंगभूमीवर येऊन पुस्तकरूपाने प्रसिध्द झाले.

राम गणेश गडकरी यांचा ही नाटय कलेची सेवा पुढे अशीच अव्याहत सुरू राहिली. त्यांचे दुसरे नाटक 'पुण्यप्रभाव' १९१६ मध्ये प्रयोग रूपाने रंगभुमीवर येऊन रसिक प्रेक्षकांच्या स्वाधीन झाले. गडकयांची नाटयशैली रसिकांच्या मनाला पसंत पडू लागली असतांना त्यानी अतिशय सुंदर अशा नाटयकलाकृतीला जन्मास घातले. ती अजरामर नाटयकृती म्हणजे 'एकच प्याला' ही होय. समाज मनावर जबरदस्त प्रभाव टाकणारे आणि

आजतागायत समाजप्रबोधन करणारे हे 'एकच प्याला' नाटक उत्कृष्ठ नाटक म्हणून नाट्यवाड्.मयामध्ये अजरामर ठरलेले आहे. पुढील आपल्या साहित्य प्रवासात 'भावबंधन' ही पूर्ण नाटक व 'राजसंन्यास' हे अपूर्ण नाटक लिहिले. १९०७ च्या सुमारास त्यानी लिहिलेले 'वेडयाचा बाजार' हे प्रहसन अपूर्ण राहिले . १९०८–०९ च्या सुमारास लिहिलेले 'गर्वनिवार्ण' हे नाटक राजकीय दृष्टया आक्षेपार्ह ठरण्याचा संभव आहे अशी त्यांना भीती वाटल्यामुळे ते त्यांनी आपल्याच हाताने नाहीसे करून टाकले. याच वेळी 'रंगभूमी' मासिकात रंगभूमीविषयीचे त्याचे छोटे छोटे विनोदी लेख प्रसिध्द झाले.

१९१९ च्या सुमारास जानेवारी मध्ये गुजरातच्या कुशीत जन्मास आलेले राम गणेश गडकरी विदर्भातील सावनेरच्या कुशीत विसावले. अवघे चौतीस वर्षाचे आयुष्य या महान साहित्यिकाला लाभले. १९११ पासून सुरू केलेला साहित्य प्रवास अगदी बहरात असताना संपला त्यामुळे मराठी सास्वताची सेवा करणारा एक साहित्यिक या सेवा कार्याला मुकला त्यामुळे मराठी साहित्याची अपरिमित अशी हानीच झाली. पण अल्पावकाशात नाटक, कविता आणि विनोद या साहित्याच्या तिन्ही शाखांत त्यांनी केलेला पराक्रम इतका अद्वितीय ठरला की, प्रत्यक्ष त्यांच्या दोन्ही गुरूंचे म्हणजे श्रीपादकृष्ण कोल्हटकरांचे आणि केशवसुतांचे वाड्मयीन कार्य काही काळ त्यापुढे मराठी रसिकांना निष्प्रभ वाटू लागले. केवळ सात आठ वर्षाच्या वाड्.मयीन कर्तबगारीच्या बळावर राम गणेश गडकरी मराठी रसिकांच्या गळयातील ताईत बनले. इतक्या अल्प अवकाशात इतकी अमाप लोकप्रियता आणि परिणामक्षमता संपादन करण्याच्या बाबतीत ते विष्णुशास्त्री चिपळूणकरांशी तुल्यबळ ठरले. अव्याहत वर्षानुवर्ष स्मृतिदिन साजरा केला जाण्याचे, लोकांच्या भक्तीचे निदर्शक असे भाग्य लोकमान्य टिळकांना मिळाले ते मराठी वाड्.मयातील दिवंगत आधुनिकांत गडकऱ्यांच्या वाटयाला आले. हे डॉ. अ. ना.देशपांडे यांचे विधान अगदी तंतोतंत लागू पडते.

# राष्ट्रसंताच्या ग्रामगीतेतील जीवन शिक्षण

कु.प्रियंका बांबल
बी.ए. भाग १



भारतासारख्या प्राचीन देशामध्ये शिक्षणाचे पाळेमुळे ऋषीमुनींच्या काळापासून रुजलेली आहेत. त्याही काळामध्ये विविधांगी शिक्षण ऋषीमुनींच्या सानिध्यात राहून विद्यार्थ्यांना दिले जात होते. जस –जसा काळ बदलत गेला तसतसे काळानुरुप शिक्षणपध्दती बदलत गेली. आजचे शिक्षण व पूर्वीचे शिक्षण यामध्ये तत्कालीन वर्तमान स्थितीचा विचार व गरज लक्षात घेता शिक्षणाचे नवनवे प्रवाह सुरु झाले व ते आज आपल्याला दिसतही आहे. शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही व त्याशिवाय मानवाची प्रगती नाही असे विचार अनेक थोर विचारवंतांनी मांडले. त्यांना अभिप्रेत असलेले शिक्षण व सध्याच्या परिस्थितीत उपलब्ध असलेले शिक्षण यामध्ये तफावत असल्याचे दिसून येते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी विविध पैलूंचा विचार करुन ग्रामगीतेमध्ये ग्रामोध्दाराची संकल्पना अत्यंत सुटसुटीत भाषेत मांडलेली आहे. त्यामध्ये देवदर्शन, आश्रमधर्म, ग्रामरक्षण, ग्रामआरोग्य, संघटनशक्ती इ. च्या सोबतच जीवनशिक्षणाची संकल्पना सुबकपणे मांडलेली आहे.

ग्रामगीतेतील जीवनशिक्षण (अ. 19 ) अत्यंत सोप्या आणि सुटसुटीत भाषेत जीवनशिक्षण म्हणजे नेमके काय, त्याचे स्वरुप काय, त्याची गरज काय, त्याची प्राप्ती कशी करावी यासंबंधी ओघवत्या भाषेमध्ये जीवनशिक्षणाची संकल्पना विशद केलेली आहे.

'नगरामाजी नागरचि होइजे' । यासाठी शहरचि विद्यार्थ्यां पाहिजे ।
खेडयामाजी 'नांगरचि वाहिजे' । ऐसे होते ।।3।।
ऐका ऐकी जयांची भावना । लक्ष द्यावे त्यांनी या वचना ।
येथे शिक्षणाची मूळ कल्पना । तीच चुकली आपूली ।।4।।
दिखाऊ कपडे, कोरडी ऐट । नोकरपेशी थाटमाट ।
हे शिक्षणाचे नव्हे उद्दिष्ट । ध्यानी घ्यावे नीट हे आधी ।।5।।

वरील पक्तींमध्ये राष्ट्रसंत म्हणतात, शहरी भागामध्ये म्हणजेच नगरामध्ये राहणारा विद्यार्थी हा शहरीच पाहिजे पण खेडयातील विद्यार्थी त्याला शेतातील नांगर चालविण्याचे शिक्षण द्यायला हवे. निवड थाटमाट व दिखाऊ कपडे हे शिक्षणाचे उद्देश नव्हे हे ध्यानात घेतले पाहिजे याचाच अर्थ केवळ कागदोपत्री पदव्या घेऊन अभ्यासाक्रमापुरते विद्यार्थी प्राप्त करु शकतो पण जीवनाची लढाई लढण्याचे शिक्षण त्यामधून प्राप्त होऊ शकते. हे स्पष्ट करण्यासाठी सुध्दा राष्ट्रसंत पुढे म्हणतात,

नुसते नको उच्च शिक्षण । हे तो गेले मागील युगी लपोन ।
आता व्हावा कश्टिक, बलवान । सुपुत्र भारताचा ।। 9 ।।
नदी,तलाव आणि विहिरी । यात पोहणे नानापरी ।
आपत्ती येता धावोनि तारी । ऐसे शिक्षण असावे ।। 13 ।।

म्हणजेच पदव्या आणि त्यानंतरचे हे कितीही उच्च शिक्षण घेतलेला विद्यार्थी त्याला समाजात वावरतांना, उद्भवलेल्या विविध परिस्थितीला तोंड देतांना अंगी असावे लागणाऱ्या गुणांची प्राप्ती शिक्षणातून होत असेल तर तेच खरे जीवन शिक्षण होय.

मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी ।।

या उक्तीप्रमाणे मुलींना मुलांप्रमाणेच बरोबरीचा दर्जा दिला पाहिजे. असा संदेश जरी प्राप्त होत असला तरी स्त्रीयांसाठी समाजात वावरतांना असावे लागणारे शिक्षण या अगोदर राष्ट्रसंतांनी खालील ओळीतून मांडलेले आहे

मुलगी बहु शिकली शाळेमाझारी । परि स्वयंपाक करता न ये घरी ।
काय करावी विद्याचातुरी? । कामाविण लंगडी ती ।। 16 ।।
अशिक्षित स्वयंपाक करोनि खाई । सुशिक्षित चणे फाकीत राही ।
दोरास घालता नये वंधाहि । जेथे तेथे पराधीन ।। 17 ।।

वरील ओळींमध्ये राष्ट्रसंतांनी जीवन जगण्याचे शिक्षण प्राप्त केलेली स्त्री व नुसतेच कागदाचे शिक्षण प्राप्त केलेली स्त्री यामधील फरक मोठया सुंदरतेने कथन केलेले आहे. उच्च शिक्षण झालेली स्त्रि घरकामात तरबेज नसेल तर तीची अवस्था एखाद्या पंगू झालेल्या महिलेशी होते.

शिक्षणाबरोबरच आजचा युवक सामर्थ्यवान बलवान असला पाहिजे व प्रसंगी आलेल्या विपरीत परिस्थितीशी दोन हात करण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असले पाहिजे जर तसे नसेल तर काय होते त्याची जाण राष्ट्रसंताना होती म्हणून ते म्हणतात,

गावावर आली गुंडांची धाड । विद्यार्थी दारे लाविती धडाधड ।
वाडवडिलांच्या अब्रूंची धिंड । काय शिक्षण कामाचे ? ।। 22 ।।
म्हणोनि पाहिजेत बलवान मुले । कुस्ती,मल्लखांब खेळणारे भले ।
धडाडीने प्रतिकारार्थ धजले । तरीच शिक्षण कामाचे ।।23 ।।

पूर्वीच्या काळातील आश्रम शिक्षणामध्ये विविध प्रकाराच्या विद्या जसे, धनुर्विद्या,मल्लविद्या,चित्रकला,संगीतकला, यासारख्या एकुण 64 कलांचे शिक्षण दिले जायचे अशा शिक्षणातून विद्यार्थी सर्वगुणसंपन्न कसा होईल व शिक्षणातून त्याचे चारित्र, चरितार्थ, शारिरीक व मानसिक आरोग्य सुस्वस्थ कसे होईल यासंबंधी विचार करणे व त्याबरहुकुम शिक्षण पध्दती असली पाहिजे असा विचार जीवन शिक्षणाच्या संदर्भानी राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या या अध्यायातून मांडलेला आहे.

राष्ट्रसंत पुढे म्हणतात,

आईबापांनी अंगावरि । मुले ठेवू नयेत निरंतरी ।
सोपवावी बालकांच्या विद्यामंदिरी । रक्षक असतील जे त्यांना ।। 44 ।।
जन्म देण्याचे काम मातापित्याचे । शिक्षणाचे काम विद्यागुरुचे ।

ते आसक्तीने पुत्रधन देशाचे । बिघडवून नये लाडवोनि ।। 45 ।।
आईबापांचा प्रेमळ चाळा । पुरवी लहान मुलांचा आळा ।
मुलगा होतो ठोंब्या – भोपळा । अतिलाडाने निकामी ।। 46 ।।

मुल जेव्हा बालपणात वावरत असते तेव्हा मातापित्यांनी मुलांचे लाड वाटेल ते न पुरविता त्याला शिक्षकांच्या अर्थात गुरुंच्या हवाली करावे, कारण अति लाडाने मुले निकामी होण्याची भिती जास्त असते हे राष्ट्रसंतांनी अगदी सहजपणे वरील पंक्तींमध्ये सांगितले आहे. कारण या देशात जन्माला आलेले प्रत्येक मुल एक पुढे एक जबाबदार नागरिक होणार असल्याने त्याला घडविणे हे प्रत्येक सुजान आई–वडिलांचे कर्तव्य आहे.

कोठेहि मुलांना लहानपणी । व्यसने लागू न द्यावी कोणी ।
लागताचि घ्यावी झाडणी । शिक्षका – पालकांची ।।52 ।।
मुलांस म्हणे सद्‌वर्तनी राहा । आपण बिडी पिण्यात वाजवी दहा ।
मग उष्णतेने बोलतो पहा । साजरा रेलगाडीपरी ।।55 ।।

शिक्षणाबरोबरच मुलांना नैतिकतेचे शिक्षण देणे ही आवश्यक आहे. व्यसनांपासून त्यांना दूर ठेवणे हे आपले आद्य कर्तव्य आहे नाहि तर पुढील पिढी व्यसनाधीन होईल. आणि उगाच सद्‌वर्तनी राहा असे सांगत बसेल पण ते सर्व व्यर्थ होईल याची चिंता ही जीवन शिक्षणाचे मुल्य सांगतांना राष्ट्रसंतांनी मांडलेले आहे.

म्हणोनि म्हणतो बालधन । ठेवा गावकऱ्यांनो । जपून ।
कोण सांगेल निघतील रत्न । किती गावी ।।74 ।।
या कोवळया कळयामाजी । लपते ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी ।
विकसता प्रगटतील समाजी । शेकडो महापुरुष ।।76 ।।

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' अशी मराठीत म्हण आहे अर्थ असा की, आपल्या गावातील प्रत्येक बालक काय माहीत पुढे होऊन काय निपजेल हयाची आपल्याला कल्पना नसते म्हणून राष्ट्रसंत म्हणतात, या बालधनास जपण्याचे सत्कार्य करणे हे आपले आद्य कर्तव्य ठरते, कारण या बालधनातून अनेक संत, महापुरुष, समाजसुधारक लपलेली आहेत. ही रत्न जपणे आपले सर्वांचे कर्तव्य ठरते.

जीवन शिक्षणाचे मुल्य सांगतांना राष्ट्रसंतांनी भेदभावाला कुठेही थारा नाही आवर्जुन सांगितले आहे. गरिब –श्रीमंत असा भेदभाव न ठेवता जीवन शिक्षणाचे धडे सर्व मुलांना मग ते भिकाऱ्यांची मुले का असोना ती आपलीच आहेत हा सामाजिक समरसतेचे मुलगामी विचार मनी बाळगून शिक्षण हे सर्वांचे शिक्षणासाठी सर्व काही या कल्पनेतूनच या देशाचा उत्तम नागरिक कसा घडेल याचा मुलमंत्र राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या या अध्यायातून कळकळीने मांडलेला आहे.

सरते शेवटी मी एवढेच म्हणेल की, फक्त पदवी रुपी शिक्षणानेच केवळ माणूस मोठा होतो असे नाही तर त्याच बरोबर जीवनशिक्षण म्हणजेच संस्कारमुल्यवर्धित शिक्षण देणे, आत्मसात करणे म्हणजेच परिपूर्ण शिक्षण होय.

# मराठी भाषेचे वर्तमान

कु.वैष्णवी धिरडे
बी.ए.भाग ३

आजच्या उच्च शिक्षण क्षेत्रात मराठी भाषेच्या वर्तमानाचा शोध घेताना सद्यस्थितीत तिची काय अवस्था आहे हे बघावे लागेल. तत्पूर्वी 'मराठी चे भवितव्य काय आहे. असा प्रश्न कुणी विचारतो तेव्हा त्या प्रश्नात मराठीच्या भविष्याबाबत विचारणाऱ्यांच्या मनात भविष्याबद्दल शंका आहे याची जाणीव होते. खरेच! मराठीची सद्यस्थितीतील वाटचाल, तिला बदल देऊन इतर भाषेचा उपयोग लक्षात घेता मराठीची अवस्था फारशी चांगली नाही हे जाणवते व तिच्या भविष्याबाबत विचार करावासा वाटतो.

उच्च शिक्षण क्षेत्रात मराठी भाषेचा उपयोग संपूर्ण महाराष्ट्रात मातृभाषा म्हणून केला गेला. परतु त्याच मातृभाषेचे लक्तरे आज वेशीवर टांगलेले दिसते. ज्या पध्दतीने मराठी भाषेच्या उगमापासून तिचे संवर्धन केल्या गेले, तसल्या जाणीवा किंवा ती गंभीरता आज राहिलेली दिसत नाही. आजपर्यंत मराठी भाषेचे गोडवे अनेकांनी गायले आहेत, ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे,'माझ्या मराठीचे बोलू कवतुके परि अमृताते पैजा जिंके' म्हणजे ही भाषा अमृताहूनही सरस वाटते. ती नुसतीच गोड नाही तर नवजीवन देणारी आहे.

माधव ज्युलीयन यांच्या 'मराठी असे आमुची मायबोली' या कवितेत मराठी भाषेच्या इतिहास, भूगोल आजची स्थिती व तिचे उज्वल भवितव्य वगैरे वर्णन थोडक्यात व अर्थपूर्ण आहे. या कवितेची एक ओळ अशी 'हिच्या लक्तराची असे लाज आम्हा, नका पाहू तिच्या फक्त लक्तरा' या ओळीत कवीला या भाषेची अवस्था दयनीय झाली आहे हे मान्य आहे आणि ते सत्य आहे असे म्हणावे लागते.

आज आम्हाला निखळ मराठी भाषेत बोलायला लाज वाटायला लागली आहे. म्हणून आम्ही आमच्या मातृभाषेला हिंदी व इंग्रजीचे असंख्य ठिगळे लावायला लागलो आहे. शहरी उच्चभ्रूंपासून ग्रामीण भागातील सामान्य लोकांना सुध्दा मराठीचे हे ठिगळे लावलेले वस्त्र वापरण्यात धन्यता वाटते. म्हणून शहरी माणूस बोलतांना अर्धे इंग्रजी व अर्धे मराठी असे संमिश्र बोलून आपली दुधाची तहान ताकावर भागवितांना दिसतात. अशाचप्रकारची अनावस्था जर मुकूंदराजाच्या ठिकाणी असती तर विवेकसिंधूचा जन्म झाला नसता व चक्रधरांनी आपल्या शिष्यांना मराठीचे महत्त्व, मराठीविषयीचा अभिमान बाळगला नसता तर आज महानुभाव संप्रदायाच्या अनुषंगाने जे मराठीचे दालन समृध्द झालेले दिसते कदाचित ते दिसले नसते. तसेच ज्ञानेश्वरांनी 'मराठीच्या नगरीत ब्रम्हविद्येचा सुकाळ केला' नसता तर आज भावार्थदीपिकेसारखा ग्रंथ निर्माण झाला नसता आणि नाथांना 'संस्कृत वाणी देवे केली प्राकृत काय चोरापासूनी आली' हा दृष्टीकोन बाळगला नसता तर आज नाथांचे साहित्य मराठी भाषेत न राहता संस्कृत भाषेत निर्माण झाले असते. संत साहित्य, पंडिती साहित्य व शाहिरी वाडमयाचा आस्वाद घेता आला नसता हीच मळवाट केशवसुतांपासून अनेक कवी, लेखकांनी अवलंबिली म्हणून एवढे मराठीचे समृध्द दालन आज आपल्यासमोर उपलब्ध आहे. परंतु आजच्या विद्यमान परिस्थितीत निर्माण

झालेली स्थिती काहीशी वेगळी आहे. आज आपल्याला शहरी ग्रामीण भागात मराठी भाषेचा उपयोग करताना मराठीत इंग्रजी शब्दाची घुसळण होताना दिसते. वास्तविक या सर्व शब्दांना रूढ प्रचलित मराठी शब्द आहेत. पण आम्हाला इंग्रजीची हौस! या हौसेमुळे आम्ही बऱ्याच मराठी शब्दाचे ओढून ताणून इंग्रजीकरण करून ऐट मिरवितो.

मराठी भाषेची भरभराट करायची असेल तर तिची दयनीय अवस्था का झाली याचा अभ्यास करून मग त्यावर उपाययोजन ठरवून पाउले उचलली पाहिजेत. केवळ मराठी भाषेची दिवसेंदिवस पिछेहाट होत आहे अशी ओरड करून चालणार नाही. तर त्याच मराठी भाषेविषयी ती श्रेष्ठ व सुंदर आहे. याच भाषेच्या जोरावर आपण ज्ञान प्राप्त करू शकतो हा आत्मविश्वासही आपल्यात निर्माण झाला पाहिजे. संगणकाच्या माध्यमातून जे ज्ञानभांडार इंग्रजी भाषेत उपलब्ध आहे तेच आजच्या नवतरूणांनी मराठी भाषेत उपलब्ध करण्यासाठी धडपड केली पाहिजे. केशवसुत, चिपळूणकर, ह.ना. आपटे यांच्या सारख्या लेखकांनी पाश्चात्य प्रवाहातील नवीन साहित्यप्रकार मराठीत रूढ केले नसते तर कदाचित आजचे आधुनिक मराठी साहित्य निर्माण झाले नसते. त्याच प्रकारचा टप्पा आज निर्माण झाला आहे. आम्हाला असे वाटायला लागले आहे की, इतर भाषांमध्ये जे ज्ञान उपलब्ध होऊ शकते ते मराठीत मिळणार नाही म्हणून आज शिक्षणाचा प्रवाह बदलतांना दिसतो. समाजात एका नव्या संस्कृतीचा जन्म होतो आहे. ती म्हणजे आजची कॉन्व्हेंट संस्कृती होय. याच प्रवाहाकडे सर्वांचे लक्ष आज वेधले जाते आहे. त्यामुळे मराठी भाषेला ग्रामीण आणि शहरी भागात इंग्रजी आणि हिंदी भाषेचे अस्तर लागतांना दिसते. त्यामध्ये आम्हाला आमच्या बोली भाषेविषयी, पोटभाषेविषयी आणि प्रमाण भाषेविषयीचा असलेल्या जिव्हाळयाला सुरंग लागल्यासारखे वाटते. याचा प्रत्यय डॉ. डेव्हीड क्रिस्टल या भाषावैज्ञानिकाने केलेल्या संशोधनात येतो. ते म्हणतात, 'जगात दर पंधरा दिवसात कुठे ना कुठे एक भाषा मरत आहे'. म्हणजे, त्या भाषेचा अखेरचा भाषक काळाच्या पडद्याआड जात आहे. सध्या जगात सुमारे ६० भाषा अशा आहेत की, त्यांचा प्रत्येकी एकच भाषक जीवंत आहे. जगातल्या सुमारे ९६ टक्के भाषा फक्त चार टक्के लोक बोलतात. भारतातही शेकडो भाषा बोलल्या जातात यातल्या अनेक भाषा मरणासन्न आहेत. याला कारण अर्थातच इंग्रजी भाषेचा प्रचंड स्टीमरोलर त्यांना दाबून टाकत आहे. डॉ.क्रिस्टल यांच्या मते, १९९० च्यापूर्वी इंग्रजी ही जागतिक भाषा नव्हती. इंग्लिश ही जागतिक भाषा होण्याचे एकमेव कारण म्हणजे तिची ताकद, असे डॉ. क्रिस्टल यांना वाटते. डॉ.क्रिस्टल हे वेल्स विद्यापीठात भाषाविज्ञानाचे प्राध्यापक असून गेल्या चाळीस वर्षात त्यांनी या विषयावर शंभर पुस्तके लिहिली आहेत. ती ताकद राजकीय वैज्ञानिक, आर्थिक आणि सांस्कृतिक अशी चार प्रकारची आहे. मुळात जगाच्या दहाव्या क्रमांकावर असलेल्या आपल्या मराठी भाषेसमोर सुध्दा हाच प्रश्न आहे.

मराठी भाषेबददल व साहित्याबददल चिंता व्यक्त करताना कुमार केतकर असे म्हणतात, ''आज जे मराठी भाषेच्या व सर्जनशिलतेच्या नावाने आक्रोश करीत आहेत त्यांनीच ही अवस्था मराठी भाषेवरती आणली आहे. विशिष्ट ब्राम्हणी चौकटीच्या बाहेर, शहरी व ग्रामीण मध्यमवर्गीय अनुभवसृष्टीच्या पलीकडे, मनोविश्लेषनाच्या जाळयाबाहेर आणि भावूक व गहिवरलेल्या नात्यांना जंजाळाच्या पलिकडे साहित्य असू शकते याचे भान बहुतेक मराठी साहित्यिकांनी कधीही दाखविले नाही. आपल्याच वर्तुळात आत्मधुंद होऊन आणि परस्पराविषयीच्या हेवेदावे—मत्सरातून बाहेर न

पडलेल्या या साहित्यिकांनी मराठी भाषेवर व संस्कृतीवर केलेला आघात हा जागतिकीकरणाच्या आघातापेक्षाही अधिक क्रूर आहे''

आपल्या मराठी भाषेचे व्यवहारक्षेत्र संकुचित न होता, ते अधिक व्यापक कसे होईल यावर इलाज आपणच शोधून बाजार, मनोरंजन,शिक्षण आणि न्याय या चार क्षेत्रात तरी मराठीची काय अवस्था आहे, याची वस्तुनिष्ठ चिकित्सा प्रथम केली पाहिजे. मराठीचे सोळाव्या—सतराव्या शतकातील भौगोलिक क्षेत्र आजच्यापेक्षा अधिक व्यापक होते, असे काही नोंदीवरून लक्षात येते. मग ते अलीकडे का संकोचले?या प्रश्नावर सन १९२६ सालीच इतिहासाचार्य राजवाडे यांनी अशी टीका केली आहे की, ''मराठीची ज्ञानभाषा,संपर्कभाषा आणि व्यवहारभाषा करण्याचे आपले प्रयत्न कमी पडले, हे एक महत्वाचे कारण आहे. उदा. 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर आणि 'केसरी' कार बाळ गंगाधर टिळक यांनी आपले महत्वाचे ग्रंथ मराठीत न लिहीता ते इंग्रजीत लिहिले. आपले गहन विचार मराठीत व्यक्त करणे अशक्य आहे, असे त्यांना वाटले असावे काय?घरच्या गरीब माणसांची उपेक्षा करून बाहेरच्या श्रीमंताना मेजवानी देण्याचा हा प्रकार आहे, असे राजवाडे यांनी सुनावले आहे. मराठी ही ज्ञानभाषा व्हावी या भावनेतून राजवाडे यांनी संताप व्यक्त केला आहे. 'आर्यांचे मुलस्थान' हा ग्रंथ इंग्रजीत लिहून आपण मराठीचा गुन्हा करतो आहोत, हे टिळकांच्या लक्षात का येऊ नये, असे म्हणून राजवाडे पुढे म्हणतात की, हे असेच चालले तर मराठी भ्रष्ट नव्हे तर नष्टच होईल. थोडक्यात, आपल्या मौलिक विचार मराठी भाषेतून व्यक्त करणे शक्य नाही, अशा प्रकारची भावना म्हणजे न्यूनगंड होय.

